**जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड (महाराष्ट्र शासन), यांनी प्रस्तावित केलेल्या बीड जिल्हयातील माजलगाव, परळी वैजनाथ, गेवराई व बीड तालुक्यातील ३८ वाळूघाटाच्या संदर्भात दिनांक ०६/०२/२०२४ रोजी दू. १२:०० वा. डी.पी.डी.सी. हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्तांत :**

..........................................................................................................................

जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड (महाराष्ट्र शासन), यांनी प्रस्तावित केलेल्या बीड जिल्हयातील माजलगाव, परळी वैजनाथ, गेवराई व बीड तालुक्यातील ३८ वाळूघाटाच्या संदर्भात दिनांक ०६/०२/२०२४ रोजी दू. १२:०० वा. डी.पी.डी.सी. हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यात आली होती.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-१०३/ २०२४ पत्र क्रं. बी.ओ. / जे.डी.(डब्ल्यूपीसी) / पीएच / बी- २४०११७- एफटीएस-००२१ दि. १७/०१/२०२४ अन्वये, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती गठीत करण्यात येऊन खालीलप्रमाणे समितीचे सदस्य सदर लोकसुनावणीस उपस्थित होते.

१. **श्री. शिवकुमार स्वामी,** : अध्यक्ष
अप्पर जिल्हादंडाधिकारी, बीड.

२. **श्री. सुजित ढोलम,** : सदस्य
प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, औरंगाबाद.

३. **श्री. सो. म. कुरमुडे,** : समन्वयक
उप-प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, जालना.

श्रीमती. सीमा मांगुळकर, क्षेत्र अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, जालना यांनी उपस्थितांचे स्वागत करुन पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समितीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सदर जाहीर लोकसुनावणीची कार्यवाही सुरु केली. त्यांनी सांगितले की, जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांनी प्रस्तावित केलेल्या बीड जिल्हयातील माजलगाव, परळी वैजनाथ, गेवराई व बीड तालुक्यातील ३८ वाळूघाटाबाबत पर्यावरणविषयक

जाहीर लोकसुनावणी घेण्यासाठी आपण येथे जमलो आहोत. सदर प्रकल्प हा पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकारचे अधिनियम दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या अधिसूचनेनुसार 'ब' वर्गात मोडतो. ज्यास महाराष्ट्र शासनाची पर्यावरण विषयक मंजुरी घ्यावी लागते, त्याचाच एक भाग म्हणून सदर प्रकल्पासाठी जाहीर लोक सूनावणी घेणे आवश्यक आहे. तसेच जिल्हा खनिकर्म अधिकारी, बीड यांचा बीड जिल्हयातील वाळू घाटाबाबत पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यासाठी रितसर अर्ज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दि. २७/१२/२०२३ रोजी प्राप्त झाला होता. त्याअनूषंगाने मा. जिल्हाधिकारी बीड यांच्या परवानगीने आजची लोकसूनावणी डी. पी. डी. सी. हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे दिं. ०४/०१/२०२४ वेळ-दूपारी १२.०० वा. निश्चित करण्यात आली. सदर पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी बाबत नियमानूसार ३० दिवस अगोदर दिं. ०४/०१/२०२४ रोजी दैनिक सकाळ व दैनिक टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रामध्ये जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आली. तसेच जिल्हयातील संबंधित शासकीय कार्यालये व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर सदरच्या प्रकल्पाची माहिती पुस्तिका नागरिकांच्या अभ्यास व अवलोकनाकरीता ठेवण्यात आलेल्या होत्या, त्याची यादी खालीलप्रमाणे-

१. जिल्हाधिकारी कार्यालय, बीड.
२. जिल्हा परिषद, बीड.
३. जिल्हा उद्योग केंद्र, बीड.
४. तहसिलदार, तहसिल कार्यालय- माजलगाव, परळी वैजनाथ, गेवराई, बीड.
५. ग्रामपंचायत कार्यालय, तालूका माजलगाव- रिधोरी, गव्हानथडी, हिवरा, काळेगांथडी, पुरूषोत्तमपुरी, मांजरत, आबेगाव, सरवार पिंपळगाव, गंगामसला, अडोळा, सांडस चिंचोली. तालूका परळी वैजनाथ- तेलसमुख. तालूका गेवराई- बोरगाव बु., गुंतेगाव, सुरलेगाव, राक्षसभूवन, खामगाव, हिंगणगाव, गोडी खु. तालूका बीड- रांजेगाव, रामगाव, ब-हाणपुर, आडगांव, कुक्कडगाव, बहादरपूर, साक्षलपिंपरी.
६. उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, प्लॉट नं. पी-३/१ व पी-३/२, अतिरीक्त एमआयडीसी फेज-२, जालना.
७. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, भूखंड क्रं. ए-४/१, एमआयडीसी चिकलठाणा, छत्रपती संभाजी नगर.
८. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरू पॉईन्ट, ३ रा माळा, सायन माटूंगा स्कीम रोड नं.८, सायन सर्कल समोर, सायन (पूर्व), मुंबई-२२.
९. पर्यावरण विभाग, नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२.
१०. प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य विभाग, तळमजला, पूर्व विंग, नविन सचिवालय इमारत, सिव्हील लाईन, नागपूर.

तसेच त्यांनी नमुद केले की, याबाबत काही सूचना/आक्षेप असल्यास याबाबत कळवण्यासाठी ३० दिवसाची मूदत देण्यात आलेली होती त्या अनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, जालना येथे एकही सूचना/आक्षेप लेखी स्वरूपात आजपर्यंत प्राप्त झालेले नाहीत.

त्यानंतर श्री. सो. म. कुरमुडे, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, जालना तथा समन्वयक पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी यांनी सर्वप्रथम महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे आजूबाजूच्या गावातील उपस्थित सर्व नागरिकांचे स्वागत केले. तसेच पूढे त्यांनी, श्रीमती. सीमा मांगुळकर, क्षेत्र अधिकारी यांनी अगोदर सांगितल्याप्रमाणे आक्षेप/टिका/टिप्पणी बाबत थोडक्यात विषद केले. तसेच त्यांनी उपस्थित नागरिकांना विनंती केली की, अजूनही आपले काही आक्षेप/टिका/टिप्पणी असतील तर ते आपण प्रकल्पाचे सादरीकरण झाल्यानंतर विचारावेत. तदनंतर त्यांनी, सदर प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे सादरीकरण करण्याविषयी विनंती केली.

त्यास अनुसरुन प्रकल्पाचे पर्यावरणीय सल्लागार प्राजक्ता म्हस्के, मे. महाबळ एनव्हायरो इंजिनीयर्स प्रा. लि., मुंबई यांनी प्रकल्पाबददल तालूकानिहाय विविध मुदयांवर सादरीकरण केले जसे की, प्रकल्पाचा तपशील, पर्यावरणीय प्रदूषण, योजना साधने, करण्यात येणा-या उपाय योजना इं. समावेश होता. बीड जिल्हयातील माजलगाव, परळी वैजनाथ, गेवराई व बीड तालुक्यातील प्रस्तावित असलेल्या वाळूघाटासाठी पर्यावरणविषयक मंजूरी साठी अर्ज केलेला आहे.

त्यांनी पूढे सांगितले की, सदर वाळूघाटावर वाळू उपसा करण्यासाठी कुदळ, फावडे, घमेले यासारख्या हातांच्या साधनांचा उपयोग केला जाईल. केवळ कोरडया नदीच्या पात्रातून वाळू उत्खनन केले जाईल. कूठल्याही मशिनरीचा वापर केला जाणार नाही. वायू प्रदूषण नियंत्रणासाठी वाळू वाहतुकीसाठी वापरल्या जाणा-या कच्च्या रोडवर नियमित पाणी शिंपडले जाईल. फक्त टॅक्टर ट्रॉली द्वारे नदीपात्रातून वाळूची वाहतूक ताडपत्रीने झाकुन करण्यात येईल. ध्वनी प्रदूषण नियंत्रणासाठी खाणकाम आणि वाळू वाहतुक केवळ दिवसाच्या वेळीच केली जाईल. जल प्रदूषण नियंत्रणासाठी वाळू उत्खनन केवळ कोरडया नदीच्या बेडवरच केले जाईल. खाण खडयाची खोली नदीच्या पाण्याच्या पातळीवरच ठेवली जाईल. निष्क्रीय वाहिन्या तयार करण्यासाठी नदीचे प्रवाह वळविले जाणार नाहीत, नदीत वाहने धुण्यास मनाई करण्यात येईल, खाणकामातून कोणतेही सांडपाणी तयार होणार नाही याची काळजी घेण्यात येईल. कामगारांना मोबाईल टॉयलेटची सोय करण्यात येईल, पावसाळयात आणि पूरात उत्खनन टाळले जाईल यामुळे वाळू उपसा पुन्हा भरु शकेल. जमीनीचे पर्यावरण समतोल राखण्यासाठी खाणकाम

परवानगी घेतल्याच्या क्षमतेपेक्षा जास्त होणार नाही, नदीकाठ आणि जवळपास मोकळया जागांवर वृक्षारोपन विकसित केले जाईल. खाणीमध्ये काम करणा-यांना वैयक्तिक संरक्षणात्मक उपकरणे दिली जातील. खाण साईटवर प्रथमोपचार किट प्रदान केले जाईल. पर्यावरणाची हानी होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

तालुक्यातील वाळुघाटाची माहिती खालील प्रमाणे आहे.

**<u>तालुका माजलगाव-</u>**

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र हेक्टर | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | रिधोरी | १७७/१, ३,१२,१३,१५ ते १८, ३९ | ९००x५०x१.० | ४.५० | १५९०९.०६ |
| २ | गव्हानथडी | २२ ते २९, ३३ ते ३५, ३१,४० | ५००x५०x०.८० | २.५० | ७०६७.१३८ |
| ३ | हिवरा १ | ७५,७४,६८,६७,५६ ते ५८ | ५००x४०x१.० | २.० | ७०६७.१३८ |
| ४ | हिवरा २ | ५४,३९ ते ४२, २२ ते २९, ३० ते ३५ | ६३०x७०x१.० | ४.४१ | १५५८३.०४ |
| ५ | हिवरा ३ | १ ते ३, ५,६,१६,१७ | ३५०x५०x१.१० | १.७५ | ६८०२.१२ |
| ६ | डुब्बाथडी ३ | ६१,६२, ३ ते ८ | ११००x४५x१.१० | ४.९५ | १९२४०.२८ |
| ७ | पुरूषोत्तमपुरी | १२ ते २१, २४ ते २६, ३१,३२,३६,३७ | ७५०x५०x१.०० | ३.७५ | १३२५०.८८ |
| ८ | मांजरत १ | ३६ ते ४०, ४३, ४९, ५०, ५२, ५५ | ९००x५०x१.० | ४.५ | १५९०१.०६ |
| ९ | मांजरत २ | २१ ते २४, २६, २७, ३१, ३२, ३४ | ९००x५०x१.२० | ४.५ | १९०८१.२७ |
| १० | मांजरत ३ | ४८४, ४८६ ते ४८८, ४९५, ४१७ | ६००x७०x१.० | ४.२ | १४८४०.९९ |
| ११ | आबेगाव | ४८५ ते ४८७, २८९, १,४ ते ६ | १२२०x४०x१.१ | ४.८८ | १८९६८.२ |
| १२ | सरवार पिंपळगाव | १२४, १३४, १३७ ते १४०, १४५, १५३, १५४, १५६ | १३०० x३५ x१.० | ४.५५ | १६०७७.७४ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १३ | कवडगावथंडी | २१, १२, २१, ३७, १५, २१६ | १२५०x३०x०.६० | ३.७५ | ७९५०.५३ |
| १४ | गंगामसला | १७८, १७४, १७३ | १४००x३५x१.५० | ४.९ | २५९७२ |
| १५ | अडोळा | २६, १२, ७२,२८, ५२, ८७, २८८ | २००x२०x१.०० | ०.९ | २१८० |
| १६ | सांडस चिंचोली | ३७, ४६, ५०, ५१, ५४, ५५ | १७५x४०x०.४५ | ०.७ | १११३ |

**तालुका परळी वैजनाथ-**

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र हेक्टर | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | तेलासमुख १ | १, ९२ ते ९८, ८४ ते ९०, ८२ | १४००x३५x१.० | ४.९० | १७३१४.४९ |
| २ | तेलासमुख २ | १०,१६, १३, १४, ३, ४ | ३००x९०x१.३० | २.७० | १२४०२.८३ |

**तालुका गेवराई.-**

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र हेक्टर | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | बोरगाव बु.१ | ४, १, १७६, १७४ | ४५०x४०x०.८० | १.८० | ५०८८.३३९ |
| २ | बोरगाव बु.२ | १५९, १६६, १६७, ११०, १७२, १७३ | १२००x४०x१.० | ४.८० | १६९६१.१३ |
| ३ | पाथरवाला खु. | १, २, ३, ४, ६० | ६००x४०x०.५० | २.४० | ४२४०,२८३ |
| ४ | गुंतेगाव | १०, ११, १२, १३ | ६००x६०x०.५० | ३.६० | ६३६०.४२४ |
| ५ | सुरलेगाव १ | १३६, १३८, १,२,३,४ | ८००x५०x१.० | ४.०० | १४१३४.२८ |
| ६ | राक्षसभूवन १ | १८७ ते १९२, १९४ ते १९७, १ ते ३ | १२४०x३५x१.२० | ४.४३ | १८४०२.८३ |
| ७ | सावरगाव नी | २८, २९, ३, ४, ८, ९ | ७५०x४५x१.१० | ३.३८ | १३११८.३७ |
| ८ | हिंगणगाव १ | ४, २, ५१ ते ५४, ७ | ९५०x५०x१.० | ४.७५ | १६७८४.४५ |
| ९ | हिंगणगाव २ | १३ ते १५, १७, १८ | ७००x५०x१.० | ३.५० | १२३६७.४९ |
| १० | गोडी खु. | १९, ३७, ३८, ४१, १, २ | ६५०x५०x१.० | ३.२५ | ११४८४.१ |

तालुका बीड -

| अ. क्रं. | वाळूघाटाचे नांव | गट क्रं. | क्षेत्रफळ लांबीxरूंदीxखोली | क्षेत्र हेक्टर | उपलब्ध वाळू साठा (ब्रास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | रांजेगाव | १ | ४५०x३५x१.० | १.५७५ | ५५६५.३७१ |
| २ | रामगाव अ | ९९ ते १०९ | ५००x२५x१.० | १.२५ | ४४१६.९६१ |
| ३ | रामगाव ब | १७ | ५००x२५x१.० | १.२५ | ४४१६.९६१ |
| ४ | ब-हाणपुर | ६,७,९ | २५०x५०x०.७० | १.२५ | ३०९१.८७३ |
| ५ | आडगांव | १२०, १२१, १२२, १२३ ते १३१ | ४००x३०x१.० | १.२० | ४२४०.२८३ |
| ६ | कुक्कडगाव १ | ३५७, ३५८, ३५९ | ४००x२५x१.० | १.०० | ३५३३.५६९ |
| ७ | कुक्कडगाव २ | १३२, १३३, १३७, १४२ | २५०x४०x१.० | १.०० | ३५३३.५६९ |
| ८ | खुदरस | ७, ६, ४, ३, २, १ | ५००x२२x१.० | १.१० | ३८८३.९३६ |
| ९ | बहादरपूर | १६८, १६९, १७०, १६०, १६१, १६२, १६३, १६४, १६५, १६६, १६७ | ५००x२२x३.० | १.१० | ११६६०.७८ |
| १० | साक्षलपिंपरी | ७७४ आणि ७८८ | ५५०x२०x२.० | १.१० | ७७७३.८५२ |

सदर माहिती सीडीमध्ये रेकॉर्डींग करण्यात आली असून संक्षिप्तमध्ये इतिवृत्तांतात नोंद करण्यात येत आहे.

प्रस्तावित प्रकल्पा विषयीचे सादरीकरण झाल्यानंतर श्री. सो.म. कुरमुडे, समन्वयक तथा उप प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, जालना यांनी उपस्थितांना सांगितले की, आपल्या लेखी/तोंडी काही टिका टिप्पणी असतील तर त्या मांडाव्यात जेणेकरुन पर्यावरण विषयक जनसुनावणीच्या इतिवृत्तात त्याची नोंद घेणे शक्य होईल असे नमुद केले. तसेच प्रथम आपण आपले नांव, गावाचे नाव सांगावे नंतर आपले काय म्हणणे आहे ते या ठिकाणी नोंदवावे अशी विनंती केली.

सदर जाहीर लोकसुनावणी दरम्यान बीड जिल्हयातील माजलगाव, परळी वैजनाथ, गेवराई व बीड तालुक्यातील सहभागी लोकांनी प्रश्न उपस्थित केले ते खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्रं | केलेले टिका टिप्पणी, आक्षेप, सुचना मुददा इत्यादी व उपस्थित व्यक्तिचे नांव. | उदयोगाच्या प्रतिनिधीने/ प्रकल्प सल्लागार यांनी दिलेले आश्वासन / उत्तर. |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १. | **श्री. भागवत शेजूळ, सरपंच, रा. आबेगाव, ता. माजलगाव, जि. बीड** यांनी विचारले की, आमच्या गावापासून १ ते २ कि.मी. अंतरावरील शिवारातील गटाचे वाळू लिलाव करण्यात यावे जेणेकरून गावाच्या आतील रस्ते खराब होणार नाहीत व पर्यावरण हानी होणार नाही. आणि याबाबतीत आम्ही ठराव देखील सादर केलेला आहे. | **श्री. सो. म. कुरमुडे, उप प्रादेशिक अधिकारी** यांनी सांगितले की, आपण मांडलेल्या प्रश्नाची नोंद घेण्यात आलेली आहे. |
| २. | **श्री. विठल जाधव, रा. हिंगणगाव, ता. गेवराई, जि. बीड** यांनी सांगितले की, आमच्या गावामध्ये जवळपास ३१ ते ३५ वर्षापासून गावाला रस्ता नव्हता. आता प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत गावामध्ये रस्त्याचे काम सूरू आहे. वाळू वाहतूक करताना गावाच्या बाजूच्या शिवारापासून करावीत. गावामधून वाळूची वाहतूक करण्यात येवू नये , याबाबत गावातील सर्व लोकांचा विरोध आहे. आणि सदरील वाळू उपसा हा ट्रॅक्टरद्वारेच करावा अवजड वाहणांचन वापर करण्यात येवू नये. वाळूचा उपसा मर्यादेतच करावा, वाळू वाहतूक करत असताना ताडपत्री चा वापर करावा, गावातील झाडांची सूरक्षा करावी, पर्यावरणाची हानी होणार नाही याची काळजी घेण्यात यावी. तसेच या वाळू लिलावामूळे ग्रापंचायतीला कशा प्रकारे फायदा होईल याबाबात सांगावे. | **यावर प्रकल्प सल्लागार**, यांनी सांगितले की, अगोदरच सादरीकरणामध्ये सांगितल्याप्रमाणे वाळूची वाहतूक ही ट्रॅक्टरनेच करण्यात येणार आहे आणि ताडपत्रीने झाकलेल्या ट्रॉलीद्वारे केली जाईल. तसेच वृक्षारोपणाबाबतीत त्यांनी सांगितले की, पावसाळयात नदीच्या काठावर आणि गावातील रस्त्यांवर स्थानिक मूळ प्रजातींच्या झाडांची लावगवड करण्यात येणार आहे. तसेच वाळू वाहतूक ही गावाच्या बाहेरील बाजूच्या रस्त्याने करण्यात येईल. तसेच या वाळू उत्खनानामूळे गावामध्ये रोजगाराच्या संधी निर्माण होतील.<br><br>**पूढे यावर श्री. सो. म. कुरमुडे, उप प्रादेशिक अधिकारी** यांनी सांगितले की, सदर वाळू उत्खनामूळे शासनास महसूल उपलब्ध होणार आहे व नियमानूसार त्यातील काही भाग हा संबंधित ग्रांमपंचायतीला गावातील विकासासाठी मा. जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनानूसार देण्यात येईल. त्यामूळे वाळू उत्खनाने नक्कीच गावाचा फायदा होण्यास मदत होईल. |
| ३. | **श्री. ज्ञानेश्वर येवले, सरपंच, रा. गोंदी खू., ता. गेवराई, जि. बीड** यांनी सांगितले की, अगोदर झालेल्या वाळू | **श्री. सो. म. कुरमुडे, उप प्रादेशिक अधिकारी** यांनी सांगितले की, आपण मांडलेल्या प्रश्नांची येथे नोंद करण्यात |

| | | |
|---|---|---|
| | उपसामूळे नदीपात्रातील पाण्याचे स्तर कमी झालेले आहे. आता पून्हा वाळू उपसा झाला तर अजूनच नदीपात्रातील पाण्याचा स्तर कमी होणार यामूळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होवून टंचाई होईल. तसेच गावामधील मूख्य रस्ता अगोदरच खराब झालेला आहे, गावात दूष्काळ परिस्थिती आहे. आता पून्हा वाळू वाहतूक होताना अवजड वाहनामूळे खराब होवून जाईल. त्यामूळे सदर वाळू लिलावास परवानगी देण्यात येवू नये अशी त्यांनी विनंती केली. | आलेली आहे. |

श्री. सो. म. कुरमुडे, यांनी उपस्थितांना विचारले की, अजूनही कोणाला कांही सुचना, आक्षेप मांडावयाचे असतील तर ते मांडू शकतात. यावेळी लिखीत स्वरूपात श्री. अभय पंडीतराव मूठाळ व इतर, मौजे डीग्रस, ता. परळी, जि. बीड, श्री. गोवर्धन साहेबराव तौर व इतर, मौजे डूब्बाथडी, ता. माजलगाव, जि. बीड व ग्रामस्थ, तेलसमूख, ता. परळी वैजनाथ, जि. बीड असे तीन निवेदणे प्राप्त झाले आहेत ते सोबत जोडण्यात येत आहे. परंतु सहभागीमधून कुठलीही सुचना टीप्पणी नसल्यामुळे त्यांनी अध्यक्ष तसेच उपस्थितांचे नागरिकांचे आभार मानले व सदर जाहीर लोक सुनावणी अध्यक्ष्यांच्या परवानगीने संपन्न झाल्याचे जाहीर केले.

| | | |
|---|---|---|
| **सो. म. कुरमुडे** | **सुजित ढोलम** | **शिवकुमार स्वामी** |
| (समन्वयक) | (सदस्य) | (अध्यक्ष) |
| तथा | तथा | तथा |
| उप प्रादेशिक अधिकारी, | प्रादेशिक अधिकारी, | अप्पर जिल्हादंडाधिकारी बीड. |
| म.प्र.नि. मंडळ, जालना. | म.प्र.नि. मंडळ, छ. संभाजीनगर. | |